Impact Factor – 6.261 Special Issue - 123 A Feb. 2019 ISSN – 2348-7143

YPC

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Journal

**Multidisciplinary International E-research Journal**

# Historiography : Recent Trends in History Writing - Local History of Khandesh

Organized by

The Shendurni Secondary Education Co-op. Society's

**Appasaheb R. B. Garud Arts, Commerce and Science College,**

Shendurni, Tal. Jamner, Dist. Jalgaon.







■ GUEST EDITOR ■

**Principal Dr. Vasudeo R. Patil**

■ EXECUTIVE EDITOR ■
**Dr. Prashant S. Deshmukh**

■ ASSOCIATE EDITOR ■
**Mr. Mahesh R. Patil**

■ CHIEF EDITOR ■
**Mr. Dhanraj T. Dhangar**

**This Journal is indexed in :**

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

**For Details Visit To :** www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned with CamScanner

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

SPONSORED

## National Multidisciplinary Conference

Organzied by

The Shendurni Secondary Education Co-op. Society's

## Appasaheb R. B. Garud Arts, Commerce and Science College,

SHENDURNI, Tal. Jamner, Dist. Jalgaon, Maharashtra, India 424204

NAAC Reaccredited B (CGPA 2.58)
The Best College Award (Consoloation) (NMU, Jalgaon)

ISO 9001-2008
"A" Grade in Academic Audit (NMU, Jalgaon)

On

# Historiography : Recent Trends in History Writing - Local History of Khandesh

**14th February, 2019**

- Jointly Organised By -
**Department of History**

- Chief Patron -

**Hon'ble Shri Dadasaheb Sanjayrao Bhaskarrao Garud**
Chairman, The Shendurni Secondary Edu. Coop Society Ltd. Shendurni

**Hon'ble, Prof. (Dr.) P. P. Patil**
Vice Chancellor, KBCNMU, Jalgaon

**Hon'ble Prof. (Dr) P. P. Mahulikar**
Pro Vice Chancellor, KBCNMU, Jalgaon

- Patron -

**Hon'ble Shri. Sagarmalji M. Jain** (Secretary)

**Hon'ble Shri. Dipak K. Garud** (Joint Secretary)

**Hon'ble Shri U. U. Patil** (Director)
The Shendurni Secondary Education Coop Society Ltd. Shendurni

- Chief Guest -

**Hon'ble Shri. B. B. Patil** (Registrar, KBCNMU, Jalgaon)

**Hon'ble Dr. Arunchandra Pathak** (Sr. Consultant, ICHR, WRO, Pune)

**Hon'ble Principal Dr. Shyam Kayande** (Nagpur)

- Organizer -

**Principal Dr. Vasudeo R. Patil**

**Prof. N. S. Sawale** (Vice Principal)

**Dr. Sanjay W. Bhole** (Vice Principal)

- Coordinator -

**Dr. Sujata C. Patil**
**Mr. Amar V. Jawale**

**Dr. Rohidas D. Gaware**
**Dr. Yogita P. Chaudhari**

- Co-Coordinator -

**Dr. Dhamma H. Dhargave**
**Dr. Vasant N. Patange**

**Dr. Ajinath N. Jivrag**
**Mr. Hitendrakumar R. Garud**



Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261
Special Issue 123A : Historiography : Recent Trends in History Writing - Local History of Khandesh
Feb. 2019

# INDEX



| No. | Title of the Paper's and Author's | Page No. |
|---|---|---|
| ०१ | सविनय कायदेभंग चळवळीत शेंदुर्णी गावातील जनसामान्यांचे योगदान<br>प्रा.डॉ. दिनेश रामदास महाजन | ००१ |
| ०२ | छोडो भारत आंदोलनात शेंदुर्णी गावातील जनसामान्यांचा सहभाग<br>प्रा.डॉ. दिनेश रामदास महाजन | ००४ |
| ०३ | वेल्हाळे मंदिर – एक अभ्यास<br>रश्मी भिरूड | ००७ |
| ०४ | व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून शेंदुर्णीचा रथोत्सव : एक ऐतिहासिक परंपरा<br>प्रा. डॉ. योगिता पांडुरंग चौधरी | ०१४ |
| ०५ | पाणी संवर्धनासंदर्भातील तीन महत्त्वपूर्ण शिलालेख (शेंदुर्णी व शेंदुर्णी परिसर, ता. जामनेर, जि. जळगांव संदर्भात)<br>प्रा.डॉ. प्रशांत एस. देशमुख | ०१६ |
| ०६ | खानदेशातील भूदान चळवळ (धुळे जिल्हा)<br>प्रा. डॉ. वसंत श्रावण देसले | ०१८ |
| ०७ | एरंडोलचा स्थानिक इतिहास<br>प्रा.डॉ. बालाजी विठ्ठलराव पवार | ०२० |
| ०८ | एरंडोल विभागाचा स्थानिक इतिहास<br>प्रा.डॉ. मीना नामदेवराव काळे | ०२३ |
| ०९ | के की मुस यांचा जीवन परिचय<br>कुणाल आधार महाजन | ०२७ |
| १० | खान्देश वस्तुसंग्रहालय जळगाव येथील पवार घराण्याच्या वस्तू व शस्त्रास्त्राचा परिचय<br>प्रा.व्ही.के. साळुंखे, प्रा.एस.ए. बेडसे | ०३० |
| ११ | सातपुड्यातील आदिवासी पावरा जमातीचे पारंपारीक उद्योग, व्यवसाय : एक अभ्यास<br>प्रा. गावीत यशवंत चेमा, डॉ. संजय जिभाऊ पाटील | ०३२ |
| १२ | भारतीय स्वातंत्र्य चळवळीत अमळनेरमधील जनतेचे योगदान<br>प्रा. अवित रघूनाथ पाटील | ०३५ |
| १३ | नर्मदा बचाव आंदोलन व खानदेशातील सुप्रसिध्द कायदेतज्ज्ञ अॅड. निर्मलकुमार सुर्यवंशी<br>श्री. भूषण शांताराम वानखेडे | ०३७ |
| १४ | अण्णासाहेब दत्तात्रय वामन पाटील यांच्या सामजिक कार्याचा ऐतिहासिक अभ्यास<br>प्रा. जी. एन. पाटील | ०४२ |
| १५ | खानदेशाचे ऐतिहासिक महत्व<br>प्रा. ए. एम. काळबांडे | ०४४ |
| १६ | ग्रामिण भागातील पारंपरिक खेळांचा इतिहास<br>प्रा. महेश आर. पाटील | ०४६ |
| १७ | स्थानिक इतिहास व वस्तुसंग्रहालय<br>प्रा. प्रफुल ह. इंगोले | ०४८ |
| १८ | भारतीय स्वातंत्र्य चळवळीत शिंदखेडा तालुक्यातील स्त्रीयांचे योगदान<br>प्रा. अमृत निंबा वळवी | ०५० |
| १९ | रामचंद्र भिकाजी गुंजीकर : चिकित्सक अभ्यास<br>प्रा. रवी सुभाषराव सातभाई | ०५३ |
| २० | मराठा कालखंडातील खानदेशचा इतिहास<br>श्रीमती देवकर रेखा चिंतामण | ०५५ |





Scanned with CamScanner

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261
Special Issue 123A : Historiography : Recent Trends in History Writing - Local History of Khandesh
ISSN : 2348-7143
Feb. 2019

# व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून शेंदुर्णीचा रथोत्सव : एक ऐतिहासिक परंपरा

प्रा. डॉ. योगिता पांडुरंग चौधरी
अप्पासाहेब रघुनाथराव भाऊराव गरुड, कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, शेंदुर्णी, तालुका जामनेर, जिल्हा – जळगाव.

**प्रस्तावना**

दरवर्षी कार्तिक शुद्ध चतुर्दशीला म्हणजेच तिथीनुसार एकादिशिपासून चौथ्या दिवशी गांवात फिरनारा शेंदुर्णी गांवाचा कलात्मक रथोत्सव आता व्दिशत्कोतर अमृत महोत्सवाकड़े वाटचाल करीत आहे. एवढी जुनी परंपरा असलेला रथोत्सव म्हणजे खान्देशातिल इतिहासाचे सुवर्ण पाण म्हणावे लागेल. या शेंदुर्णीत साजरा होणारा हा रथोत्सव जितका आध्यात्माच्या दृष्टीने महत्वाचा आहे तितकाच तो व्यवस्थापनाच्या दृष्टीने सुदधा आगला वेगळ आहे. म्हनुनच व्यवस्थापनाच्या संदर्भात या उत्सवाची पाहणी व्हावी म्हणून सदर संशोधन लेख लिहिन्यांत आलेला आहे.

*प्रती पंढरपूर हे शेंदुर्णी गाव.*
*रथ उत्सवातील आनंद – भाव.*
*संत कडोजी महाराजांच्या भक्तीभावातील*
*त्रिविक्रम भगवंतांचे नाव*
*असे प्रतीपंढरपूर शेंदुर्णी हे गाव*

महाराष्ट्रातील जामनेर तालुक्यातील प्रती पंढरपूर संबोधल्याजाणाऱ्या शेंदुर्णी गावातील येणारा २७५ वा रथोत्सव म्हणजे भाविकभक्तांची मांदियाळी. संत श्रेष्ठ कडोजी महाराजयांनी इ.सन १७४४ रोजी सुरू केलेला हा विठ्ठल–रुक्मिणी रथोत्सव आणि पालखी सोहळा आजतागायत मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. रथोत्सवच्या निमित्ताने शेंदुर्णी गावात विठूनामाचा गजर ,टाळ–मृदंगाचे मंजुळध्वनी, संत कडोजी महाराजांच्या नामाचा जयघोष, भगवान त्रिविक्रमाच्या दर्शनाचा लाभ आणि भाविक भक्तांचा जल्लोष या उत्सवाच्या निमित्ताने शेंदुर्णीकरांना दरवर्षी अनुभवता येतो.

*विविध जाती धर्माचे लोक करतात विविध सण साजरा*
*आम्हा शेंदुर्णीकरांसाठी मात्र रथोत्सवच दिवाळी दसरा*

श्री क्षेत्र शेंदुर्णीचा रथउत्सव म्हणजे शेंदुर्णी आणि परिसरातील भाविकभक्तांसाठी एकमोठा सण असतो. सासरी आलेल्या लेकी सुद्धा दिवाळीला माहेरीन येता रथोत्सवाला शेंदुर्णीत येण्यास प्राधान्य देतात. आणि ज्या मुली दिवाळीत माहेरी येतात त्यांची दिवाळी मात्र उत्सवा नंतरच संपते अशी यारथोत्सवाची गोडी येथील माहेरवासियांना आहे. संत श्रेष्ठ कडोजी महाराजांच्या वयाच्या विसाव्यावर्षी म्हणजे साधारणता इ.सन १७३४ मध्ये भगवंतांनी दिलेल्या दृष्टांता नुसार महाविष्णू त्रिविक्रमाना उकिरड्यातून बाहेर काढण्यात आले. आणि महाविष्णू भगवान त्रिविक्रमाच्या दर्शनाचायोग सर्वांना आला अशी आख्यायिका आहे. तेव्हा पासून या शेंदुर्णी नगरीस प्रतीपंढरपूर हे नावलौकिक मिळाले आहे. संत श्रेष्ठ कडूजी महाराजांनी सुरू केलेल्या रथोत्सवास अधिक उत्कृष्ट करण्याचे कार्य त्यांच्या पुढील पिढीने केले. आज हभप शांताराम महाराज भगत, संत कडोजी महाराज संस्थान गादीवारस व् ववहिवाटदार आठवे हे कुटुंब प्रमुख म्हणून मोठ्या उत्साहाने आणि भक्तिभावाने या रथोत्सवाचे नेतृत्व करीत आहे. देवाचा उत्सव म्हणजेच रथोत्सव . या उत्सवात फोटो, तोरण, झुंबर, बॅनर, सजावट चांगली केली म्हणजे झालं असं नव्हे, नगरप्रदक्षिणा, किर्तन, रोषणाई, सनई–चौघडे, लाऊडस्पीकरचा आवाज, खूपगर्दी होणे म्हणजे उत्सव चांगला झाला असे नव्हे , तर समाजातील रंजल्या–गांजल्यान पर्यंत जागृती निर्माण करणे, त्यांना आपल्या कर्तुत्वाची व कर्तव्याची जाणीव करुन देणे, धर्माचे योग्य पालन करून सदुणांची जोपासना करणे, नियमितपणा वक्तशीरपणा, शिस्त या सर्वच गोष्टींची प्रचीती येणे म्हणजेच यशस्वी रथोत्सव होय. असाच यशस्वी रथोत्सव या शेंदुर्णी गावात गादीवारस, ग्रामस्थ, अधिकारी, पदाधिकारी, वारकरी, टाळकरी, वारकरी, माळकरी, महिला भजनी मंडळी, सर्वजाती–धर्माची मंडळी एकत्रित येऊन निरंतर साजरा करीत आहेत. एका पाठोपाठ एक २७४ रथोत्सव यशस्वी करण्यासाठी येथे व्यवस्थापकीय कौशल्यांचा सातत्याने वापर केलेला दिसतो. कार्य यशस्वी होण्यासाठी नियोजन, संघटन, समन्वय, नियंत्रण, मार्गदर्शन आणि नेतृत्व करण्याची प्रक्रिया म्हणजेच व्यवस्थापन होय हीच व्यवस्थापकीय कार्य सुद्धा या उत्सवात योग्य त्यावेळी उपयोगात आणलेली आपणास दिसून येतील. शेंदुर्णीचा रथोत्सव पहिला तर साधारणता फक्त एकच दिवसाचा सोहळा आपल्या समोर येतो. पण प्रत्यक्ष कार्यकाही वेगळेच आहे. एकूण दहा दिवसांचा उत्सव असतो या उत्सवाचे योग्य ते नियोजन आणि अंमलबजावणी करणे म्हणजे तारेवरची कसरत असल्याचे विद्यमान गादीवरास ह.भ.प. शांताराम महाराज भगत सांगतात मात्र भगवान विष्णु भगवान त्रिविक्रम आणि संत कडोजी महाराजांच्या प्रेरणेने व आशीर्वादाने हा रथ उत्सव माऊलींनी चालविलेल्या निर्जीव भिंतीसारखा आपोआपच पूर्णत्वास येतो आणि भगवंताच्या अस्तित्वाची प्रचिती जनसामान्यांना देऊन जातो हे सांगण्यास ते विसरत नाहीत.

सन २०११ च्या जनगणनेनुसार शेंदुर्णी गावाची लोकसंख्या जरी २२५५३ इतकी दिसत असली तरी रथोत्सवाला आणि दर्शनाला प्रत्येक वर्षी एक लाखांच्या वर भाविक– भक्त येतात आणि एवढी मोठी गर्दी असूनही कोणत्याही प्रकारची हिंसक – त्रासदायक घटना न होता हा सोहळा निरंतर चालविला जातो याच्यामागे भगवंतांचा आशीर्वाद, भाविकांची श्रद्धा आणि त्या ठिकाणचे व्यवस्थापन या गोष्टींना आपोआपच महत्त्व जातं.सोहळ्याचे नियोजन करताना निरनिराळ्या समाजातील लोकांची खूप मोठी मदत या ठिकाणी होते. संत कडोजी महाराज जरी तेली समाजाचे असले तरी त्या ठिकाणी सर्वधर्मसमभाव आपणास दिसून येतो. भालदार, चोपदार, मशालवाले,अब्दारीवाले,उटटाकणारे, रथावर बसणारे, संरक्षक, टाळकरी माळकरी या सर्व लोकांच्या काम करण्यामुळे हा उत्सव अधिकच रंगत जातो .रथपाण्याने धुऊन स्वच्छ करणे त्याची पूजा करणे, समाधीजवळ बसणे अशा अनेक कार्यासाठी अनेक वर्षांपासून वंशपरंपरागत ही सर्व लोक उत्साहाने काम करताना आपणास दिसून येतात कोणालाही स्वतःच्या कामाचे प्रत्येक वर्षी आठवण करून द्यावी लागत नाही.योग्य समन्वयातून हे कार्य सुकर होते. रथसजवण्याचे काम भागवत मंडळ मोठ्या श्रद्धेने याठिकाणी करताना दिसते. यामध्ये सातत्याने नवनवीन प्रयोग केले जातात. वेगवेगळ्या तज्ञांकडून आलेले मार्गदर्शन त्याचा स्वीकार करून रथोत्सव अधिकाधिक रंगतदार बनवण्याचा प्रयत्न केला जातो. दर्शनाला आलेल्या लोकांचे मनोरंजन आणि ग्रामीण भागाचे परंपरा टिकवून ठेवण्याच्या उद्देशाने रथ उत्सवाच्या काळात साधारणता एक महिनाभर शेंदुर्णी गावात जत्रा किंवा यात्रा भरते यामध्ये आबालवृद्धांपासून प्रत्येक जण आपल्या आवडीच्या वस्तू खरेदी करतात प्रसाद म्हणून घेतलेले रेवडी या ठिकाणी फार प्रसिद्ध आहे त्याचप्रमाणे या यात्रेत लागलेल्या चित्रपटगृहांमध्ये सुद्धा मोठ्या प्रमाणावर गर्दी या ठिकाणी लोक करतातसोनरे सोना नदीच्या काठी बसलेली



Scanned with CamScanner


 ISSN : 2348-7143
Feb. 2019



संत श्रेष्ट कडोजी महाराज


स्वयंभू त्रिविक्रम भगवान


सुंदर सजलेल्या रथासोबत संत श्रेष्ट कडोजी महाराज संस्थांचे आठवे गादिवारस व् वहिवाट्दार ह.भ.प. शांताराम महाराज भगत


रथोत्सवाच्या आदल्या रात्री साजरा होणारा पालखी सोहळ


रथोत्सवाच्या प्रारंभाची पूजा


संत श्रेष्ट कडोजी महाराज मंदिरात स्थापित झालेली मूर्ति

ही जत्रा/यात्रा लोकांना आकर्षित केल्याशिवाय राहात नाही. या रथोत्सवात उच्चारला जाणारा अजून एक शब्द म्हणजे कानगी.कानगी चा अर्थ काहीही न ठरवता देवाला दिलेली देणगी असाही असू शकतो कारण जेव्हा भाविक भक्त रथाचे दर्शन घेतात तेव्हा दर्शन झाल्यानंतर एक गुरुदक्षिणा म्हणून ते रथावर कानगी स्वरूपात देणगी देतात यालाच याठिकाणी कानगी म्हणून संबोधले जाते. या जमा झालेल्या कानगी चा वापर रथोत्सवाची तयारीसाठी केला जातो. मनातली इच्छा पूर्ण झाली, देवाला काही साकडे करायचे असेल तर त्या समोर ठेवून भाविक याठिकाणी कांनगी देतांना दिसतात. कानगीच्या मोबदल्यात त्यांना प्रसाद म्हणून नारळ दिले जाते. या नारळाला पण खूप मान या रथोत्सवात आहे.

रथोत्सव सुरु करण्यामागे जशी संत श्रेष्ट कडोजी महाराजांची आणि त्याकाळी असलेल्या ग्रामस्थ लोकांची साथ होती तशी ती परंपरा टिकविन्यासाठी नंतरच्या काळात अनेक लोकांनी प्रयत्नांची पराकाष्ट केली. आज आपण बघितल्यांस संत श्रेष्ट कडोजी महाराजांची माढ़ी ज्या ठिकाणी होती तेथे सुंदर असे तीन मजली मंदिर बांधलेले दिसते. कै.आबासाहेब काशिनाथराव रघुनाथराव गरुड़ आणि मंदिर जिर्नोद्धार समिति यांच्या अतूट प्रयत्नांचे फल म्हणजे ते मंदिर आहे. या सर्व लोकांनी घर दार कुटुंब यांची पर्वा न करता मंदिरासाठी निधी उभा करतांना सुद्धा व्यवस्थापनाच्या आर्थिक सिद्धान्तांचा पुरेपुर वापर केलेला दिसतो. त्या जोरावरच येणारी पुढील पीढ़ी एवढ्या मोठ्या परंपरेला जवळून बघू शकणार आहे.

*रथोत्सवाचे नियोजन काही आगळेवेगळे*
*विविध जाती धर्माचे लोक समन्वय करतात सगळे,*
*नावलौकिक वाढते शेंदुर्णी गावाचे,*
*भगवान भक्तीतून फिटते डोळ्यांचे पारणे*

अशा डोळ्यांचे पारणे फेडणाऱ्या व भगवंतांच्या दर्शनाचा साक्षात्कार देणाऱ्या या रथोत्सवाच्या तयारीसाठी सर्वच शेंदुर्णीकर सज्ज झालेले असतात. येणारा २७५ वा रथोत्सव सुद्धा सालाबादप्रमाणे यशस्वी आयोजनासाठी वैविध्यपूर्ण व्यवस्थापकीय कौशल्यांचा स्वीकार निश्चितच झालेला दिसेल.

**संदर्भ सूची**

१. संत कडोजी महाराज यांचे चरित्र , आर.सी.चौधरी, जुलाई १९९२
२. जलगांव जिल्हा संकेतस्थळ
३. आधुनिक व्यवस्थापन तंत्र , पप्रा.दि.बी.पाटील,प्रशांत पब्लिकेशन.



Scanned with CamScanner